# आपलं पर्यावरण

# Introduction

# 2016

Established In officially but working since 1998

# Activities

- Maintaining Biodiversity
- Nurturing trees & birds
- Spreading Awareness
- Eco-friendly Activities



# Projects

# Humble Beginnings...

1998-99

7,000 tress (over 300 types)

- Planting and Nurturing trees
- Spreading Awareness in Schools

In Nashik - Near Jatra Hotel, Pathardi, Satpur ,Cidco ,Indira Nagar, Nashik Road, Gangaour Road, Upnagar, Jaibhavani Road, Gandhi Nagar, DGP Nagar

Around Nashik - Adgaon, Peth, Surgana, Umbarpada, Karanjali, Shinde, Anjaneri, Bharveer, Khamtane, Satana, Javhar, Dudhkhed, khadak Ozar, Gethewadi, Sinnar, Lakhalgaon, Dindori, Mokhada, Chandvad

# Medicinal Plants Cultivation






2008

Planting and Nurturing trees

180 (122 types)

Phulsunder Estate, Behind Gandhi Nagar, Takali Rd, Nashik

# Medicinal Plants Cultivation

# Medicinal plants for ecological balance

HERBAL OR MEDICINAL PLANTS ARE NOT JUST USEFUL FOR REMEDIES IN AYURVEDA BUT ALSO HELPS MAINTAIN THE ENVIRONMENTAL BALANCE. A SMALL LAND IN THE CITY HOUSES AROUND 80 SUCH VARIETIES

SUMITA SARKAR 20 Nov 2010



**Sumita Sarkar** *TAKLI ROAD*

Lack of awareness and rampant deforestation has resulted in the loss of many medicinal or herbal plants used as Ayurvedic remedies. Even in and around Nashik, there are many such plants that are depleting in numbers and varieties. The good news is that an attempt is being made to plant these herbal treasures and to create awareness.

A land that was originally reserved for constructing a garden today houses around 80 medicinal plants that are used for health remedies. This plot, around 100 ft by 200 ft, at Phulsunder Estate, behind Gandhi Nagar, Takli Road is a pleasant sight as many birds also frequent this place.

Since the past nearly two years, Shekhar Gaikwad has been planting herbal trees here. "The land was actually meant for a garden with lawn, etc. I requested corporator, Vijay Ahol, to cancel this project and he obliged when I told him what I wanted to do," he shares. "I then requested him to get the land leveled," says Gaikwad who recently planted 8-9 more varieties of plants. He informs that these are very rare plants that he brought from the Social Forestry, some from the outskirts of the city, Anjaneri, Mahabaleshwar, from the jungles and some even from Gujarat. Nevar, Kakad, Patangi, Koshim, Beeza, Narkya (used for treating cancer), Dhavda, Gorakh Chincha, Bibba, Aleev, Aasana, Moha, Kajra, Reetha, Irda, Shammi, Ankol, Bel, Kumbi, etc are among the rare varieties that he has planted.

He used to pump water from the hand pump in the Gandhinagar grounds and transport the water in his trolley to this place. This April, the corporator got a hand pump installed at this plot, which has made Gaikwad's task very easy. The compound will also be soon constructed according to the design suggested by him, he further informs. He plants, cleans the plot and waters the plants all by himself. Many birds also frequent this place, chirping on the branches of these trees.

"My aim is to create awareness and inform people about the importance of these plants and the need for their preservation. Many birds will also come here to eat the seasonal fruits and flowers of these plants. This way, the environmental cycle will also be maintained," he says.

Apart from attracting birds, herbal plants are also known to reduce pollution. These need to be preserved if we have to preserve our oldest science of medicine, Ayurveda, and to maintain ecological balance.

*sarkarsumita@indiatimes.com*

Phulsunder Estate, Behind Gandhi Nagar, Takali Rd, Nashik

# Birdhouses



2008

Nurturing bird species

14,000+

Distributed in Nashik, Mumbai, Pune, Aurangabad

# Trees on Highway






2012 | Planting and Nurturing trees | 3,000

Nashik – Sinnar Highway, Nashik – Chandvad Highway

# Trees on Highway

दि. ३० जुन २०१७

## शंभर हातांनी लावली हजार झाडे

### शेखर गायकवाड यांच्या वृक्षारोपण मोहिमेला नाशिककरांचा प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, नाशिकरोड

वृक्षरोपणाचा ध्यास घेतलेल्या शेखर गायकवाडांनी नाशिक-सिन्नर मार्गावर शंभर जणांनी दोन दिवसात एक हजार झाडे लावण्याचा विक्रम केला आहे. ही झाडे प्रस्तावीत सिन्नर सहापदरी महामार्गाच्या बाजूला लावण्यात आली असून त्यांना सांभाळण्याची जबाबदारी स्थानिक नागरिकांवर सोपविण्यात आली आहे.

पावसाळा सुरु झाल्यावर वृक्षारोपणासाठी सरकारी यंत्रणा जागी होते आणि तेवढ्यापुरती कामाला लागते; परंतु नाशिकरोडच्या शेखर गायकवाडांनी गेल्या १५ वर्षापासून सातत्याने वर्षभर वृक्षांची लागवड करण्याचे कार्य सुरु ठेवले आहे. जडलेल्या या ध्यासाला शंभरहून अधिक जणांनी मदतीचे हात पुढे केले आहेत. वर्षातले ३६५ दिवस शेखर गायकवाड वृक्षारोपण करीत असतात. दोन दिवसापासून त्यांनी नाशिक-सिन्नर या मार्गावर वृक्षारोपण सुरु केले असून याकामात शेकडो तरुणांचे हात त्यांच्याबरोबर राबत आहेत. कामाचे योग्य नियोजन करुन ग्रुप तयार करण्यात आले असून एक ग्रुपमध्ये पंधरा ते वीस कार्यकर्त्यांचा समावेश आहे. हे कार्यकर्ते पुढे जावून खड्डे करतात. त्यानंतर मागून आलेला समूह त्याठिकाणी वृक्षारोपण करतो अशी कामाची रचना केल्याने मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे 'मटा'शी बोलताना त्यांनी सांगितले.

नाशिक-सिन्नर सहापदरी मार्गालगत वृक्षारोपणाचे काम सुरु झाले आहे. कुणाचीही अर्थिक मदत, कुणाचेही सहाय्य नसताना हे युवक काम करतात तर सरकारी यंत्रणेने मात्र याकडे दुर्लक्षच केले आहे. गायकवाड यांनी दुसऱ्या टप्प्यात सिन्नर-घोटी, घोटी-विल्होळी यामार्गावर वृक्षारोपण करणार आहेत. तिसऱ्या टप्प्यात आडगाव ते चांदवड व चौथ्या टप्प्यात सातपूर ते त्र्यंबकेश्वर यामार्गावर वृक्षारोपण मोहिम राबविली जाईल. फक्त वृक्षारापण करुन ते थांबणार नसून लावलेले प्रत्येक झाड जगवण्याची जबाबदारी स्थानिक दुकानदारांवर सोपविण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. महामार्गावर असलेल्या पंक्चरच्या दुकानांचे मालक, हॉटेल्सचे वेटर, पेट्रोल पंपावरचे कर्मचारी यांनी झाडे जगविण्याची जबाबदारी घेतली असून त्यांच्या या उपक्रमाला अनेकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे.



ज्या ठिकाणी झाडे लावायची आहे अशा सर्व ठिकाणांचा सर्वेक्षण त्यांनी केले असून दुकानदारांनी झाडे जगवण्याची शपथ घेतली आहे. यात काही छोट्या वहाच्या टपरी धारकांनीही झाडे जगवावीत यासाठी पुढाकार घेतला आहे. तेही या मोहिमेत सहभागी झाले आहेत. वृक्षारोपणासाठी वड, पिंपळ, नीम, करंज, आंबट चिंच, पळस ही रोपे लावणार आहेत.

या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी अधिक माहितीसाठी ९४२२२६७८०१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

Nashik - Sinnar Highway, Nashik - Chandvad Highway

# Eco-friendly Activities






2011-2014

Cleaning and Other Activities

5,240 kg *nirmalya* & 6,000 idols collected

# Trees on Riverside



2014

Planting and Nurturing trees

125

Tapovan to Shahi Marg, Nashik

# Trees on Riverside



# गोदाकाठ हिरवाईने बहरणार

म. टा. प्रतिनिधी, नाशिकरोड

पर्यावरण जागृतीचे काम करण्याऱ्या 'आपले पर्यावरण' या संस्थेतर्फे शहरातील गोदावरीच्या काठावर शक्य असेल, अशा ठिकाणी वृक्षारोपण करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. तपोवनातील शाही मार्गावर वृक्षारोपण करण्यात येत आहे. गेल्या दहा दिवसापासून ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. आजपर्यंत १२५ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

तपोवन ते शाहीमार्गावर वृक्षारोपण; 'आपले पर्यावरण'चा उपक्रम

नाशिक जिल्ह्यातून गोदावरी नदी ज्या गावातून वाहते, तो संपूर्ण काठ हिरवा करण्याचा मानस संस्थेचे शेखर गायकवाड यांनी व्यक्त केला आहे. त्यासाठी 'आपले पर्यंवरण' संस्थेने कुणाचीही मदत न घेता उपक्रम सुरू केला असून, सर्व वयोगटातील वृक्षप्रेंमी नागरिक या मोहिमेत सहभागी होत आहे. संस्थेतर्फे पहिल्या पर्वात शाही मार्गाच्या वृक्षारोपणाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी तपोवनापासून वृक्षारोपणाला सुरुवात केली आहे. तसेच, तपोवनातील स्वामीनारायण पुलाजवळ गोदावरीला गटारीचे रुप प्राप्त झाले होते. परंतु, संस्थेच्या माध्यामातून हा परिसर संपूर्ण स्वच्छ करण्यात आला. त्याजागी विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली आहे. महापालिकेने नदी काठी दगडी भिंत बांधली असून, त्यालगत रोपांची लागवड होत आहे. येत्या सिंहस्थात संपूर्ण शाहीमार्ग हिरवा करण्यावर गायकवाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा मानस आहे. यासाठी वड, पिंपळ, उंबर पापडा, भेंडी, भोकर, चेरी, चिवन, कदंब या प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात येणार आहे. दुसऱ्या पर्वात गंगापूर गावापासून प्रारंभ करण्यात येणार आहे. योग्य त्या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार आहे. सिंहस्थापर्यंत ही मोहीम सुरुच रहाणार असून, जास्तीत जास्त नागरिकांनी या मोहीमेत सहभागी व्हावे असे आवाहन आपले पर्यावरणतर्फे करण्यात आले आहे.

### सरकारी मदत नाही


■ या कामासाठी कोणतीही सरकारी मदत घेण्यात आलेली नाही. नागरिक स्वयंस्फूर्तीने या मोहिमेत सहभागी होत आहे. नाशिक जिल्ह्यातील गोदावरीचा काठ संपूर्ण हिरवा करण्याचा मानस असून, त्यासाठी नागरिकांच्या सहभागाची आवश्यकता आहे. नागरिकांनी मोहिमेस हातभार लावल्यास अशक्य असे काही नाही, असे शेखर गायकवाड यांचे म्हणणे आहे. सकाळी ६.३० ते ८.३० वाजेपर्यंत श्रमदानातून हे काम सुरू असते. ज्या व्यक्तींना सहभागी व्हायचे असेल, त्यांनी ९४२२२६७८०१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


**K.K. Wagh Education Society**
Hirabai Haridas Vidyanagari, Amrutdham, Panchavati, Nashik- 422 003
K.K. Wagh Education Society
Organizes
**K.K. Wagh Talent Search Examination 2014**
for HSC / 12th Std. students (all streams)
**on Saturday 22nd March 2014 at 10.00 am.**
Exam will be based on JEE pattern for Science stream and MCQs f
Commerce and Arts stream (Option of Marathi medium available).
- Toppers in all streams will get **attractive prizes**.
- **Fee discount** will be given to toppers admitted to any branch of studie run by K.K. Wagh Education Society.

Details about registration available on www.kkwagh.org
**More details Contact : Prof. A.W. H. Ansari - 09096161986**
Advt.No.: 258/2014, dtd.22/02/2014


Tapovan to Shahi Marg, Nashik

# Devrai







2015

Maintaining Biodiversity

Satpur, Nashik

28,000 trees (over 360 species), home to many birds & animals

# Devrai

लोकमत

epaper.lokmat.com

सारांश

# 'नाशिक देवराई' बनतेय जैवविविधतेचा 'हॉटस्पॉट'

'देवाच्या नावाने राखलेले जंगल' अर्थात देवराई... काळानुरूप 'देवराया' या नामशेष होत चालल्या आहेत. काही मोजक्या देवरायांचा अपवाद सोडला तर नाशिक जिल्ह्यात देवराया या फारशा अस्तित्वात राहिलेल्या नाहीत; मात्र नाशिक शहरात पर्यावरण संवर्धनासाठी मागील वीस वर्षांपासून कार्यरत 'आपलं पर्यावरण' या संस्थेने सातपूर येथे वनविभागाच्या राखीव वनक्षेत्रात 'नाशिक देवराई' साकारली आहे. गिरीपुष्पाच्या लागवडीखाली असलेले हे क्षेत्र एकप्रकारचे मृत जंगल होते. या जंगलाला जिवंत करण्याचा ध्यास २०१५ मध्ये वनविभागाच्या सहकार्याने या संस्थेने घेतला आहे.


अझहर शेख
लोकमत न्यूज नेटवर्क


नाशिक शहरात सातपूर वनपरिमंडळात वनविभागाचे राखीव वनक्षेत्र आहे. हा परिसरत नऊ वर्षांपूर्वी 'फाशीचा डोंगर' म्हणून ओळखला जात होता. मात्र, २०१५सालापासून आपलं पर्यावरण संस्थेने याठिकाणी 'वनमहोत्सव' लोकसहभागातून घेतला अन् या ठिकाणाला नवी ओळख तर मिळालीच मात्र जैवविविधतेचा 'हॉटस्पॉट' बनली आहे. गेल्या नऊ वर्षांमध्ये याठिकाणी शेकडो देशी प्रजातीची हजारो झाडे, वेली, बांबूच्या प्रजातींच्या लागवड करून त्यांचे संगोपन केले आहे. त्यामुळे हे मृत जंगल आता जिवंत झाले असून या ठिकाणी वन्यप्राणी, फुलपाखरे, पक्षी जीवन, सरपटणाऱ्या प्राण्यांच्या प्रजातींची जैवविविधता समृद्ध होऊ होताना दिसत आहे. निसर्गातील जीवसृष्टीचा विचार करून दूरदृष्टी ठेवत अभ्यासपूर्ण पद्धतीने झाडांची लागवड व संवर्धन केले जात आहे. त्याचा परिणाम आता याठिकाणी दिसत आहे. नैसर्गिक अन्न साखळी टिकवून ठेवली जावी, निसर्गातील सजीव सृष्टीला पोषक असे जंगल निर्माण व्हावे हाच यामागील उद्देश आहे, असे पर्यावरणप्रेमी संस्थेचे अध्यक्ष शेखर गायकवाड यांनी सांगितले.

गिरीपुष्प झाडांनी आच्छादलेल्या या वनक्षेत्रातील मृत झालेल्या जमिनीत देशी प्रजातीच्या झाडांची लागवड करून ती जगविणे मोठे आव्हान होते. त्यामुळे वृक्ष संवर्धनाचा हा 'नाशिक पॅटर्न' यशस्वी होणार का? अशी शंका सुरुवातीला अनेक अभ्यासकांच्या मनात उपस्थित झाली होती; मात्र आपलं पर्यावरण संस्थेच्या हरित सैनिकांनी वेळोवेळी लोकसहभागातून केलेली मेहनतीमुळे ही शंका चुकीची ठरविली. विविध प्रकारच्या संकटांचा सामना करत संस्थेने याठिकाणी आजमितीला २८ ते ३० हजार देशी प्रजातीची झाडे वाढविली आहे. त्यामध्ये देशी वेली, झुडुपांचा समावेश आहे. याठिकाणी बांबू वन, पारंपरिक घनवन, वेलींचे जंगल, झुडुपांचे जंगल असे वेगवेगळे 'पॉकेट' तयार करून अभ्यासपूर्ण लागवड केली आहे. आजही या संस्थेकडून अखंडितपणे याठिकाणी संगोपन व संवर्धनाचे कार्य सुरू आहे. पुढील काही वर्षात मानवनिर्मित हे जंगल पर्यावरण चळवळीतील हरितवाटेवरील मैलाचा दगड ठरणार आहे.!



देवराईमध्ये बहरलेली देशी प्रजातीची वृक्षराजी

बिबट्या, रानससा, घोरपड, तरस, उदमांजर, रानमांजर, मुंगुस यांसारखे सस्तन वन्यप्राणी तसेच मोर, स्वर्गीय नर्तक, घुबड, भारद्वाज, पावश्या, ससाणा, घार, शराटी अशा विविध प्रकारचे पक्षी आणि घोणस, धामण, मण्यार, नाग, नाणेटी असे विविध प्रजातीचे सर्पदेखील तसेच ब्ल्यू ओक लिफ फुलपाखरूसह विविध प्रजातीही येथे आढळून येतात.


Hello Nashik
Page No. 8 Mar 18, 2024
Powered by: erelego.com


# Bamboo forest to come up at Devrai

- **1,500 seedlings of 30 species being planted to mark World Environment Day**


**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK, MAY 31


City-based environmental organisation Apala Paryavaran, which has been working in Nashik for more than 20 years, will be celebrating the eighth Forest Festival in Devrai near Satpur on World Environment Day on June 5. The organisation has resolved to set up a bamboo forest this year and has started work on it. Around 450 seedlings of rare bamboo species have been planted, and the remaining 1,000 seedlings will be planted on June 5.

Over the past 25 to 30 years, the forest department has planted hundreds of Gliricidia trees around the hill, known as Phashicha Dongar. These trees have taken roots and began blooming in large numbers in the forest area here. This forest, which is visible only during the rainy season, was earlier in a dead state. With the aim of developing biodiversity and ecosystems in this forest, Apla Paryavaran organisation had planted 12,000 native species of trees in 2015 through public participation. This has helped in reviving the dead forest.



Devrai to become nature study centre
Steps are being taken to set up a nature study centre at Devrai by Apla Paryavaran. This is being done so that the future generation will get to know and study nature.

**Devarai becomes rich in biodiversity again**

**Some years ago, Devrai region had become very dry and lacked trees and birds, and no footprints of any wildlife could be found. During these seven to eight years, there was deforestation.**

**Thousands of native species of trees are now being grown. A variety of bird species, including bees, have sprung up in the forest. Reptiles have also taken refuge here.**

**Biodiversity in Devrai**

- 25,000 plants of 220 native species
- 1,100 vines of 52 species
- 300 tuber plants of 27 species
- 250 trees of 25 shrub species
- Solid forest of 800 native trees



Both Devrai and Vanrai projects are being implemented by Apla Paryavaran through public participation. We are emphasising on the cultivation of trees, vines, shrubs and tubers in a planned and scientific manner from now on so that this forest, which is taking shape at the entrance of Nashik, will become a perfect nature study centre in future. This year, it has been resolved to create a bamboo forest and the organisation is going to hold the eighth Forest Festival on the coming World Environment Day.

**- Shekhar Gaikwad,** Founder President, Apala Paryavaran

Satpur, Nashik

# Vanrai



2016 | Maintaining Biodiversity | Dindori Rd, Nashik

6,000 trees (over 250 species), home to many birds & animals

# Vanrai

सकाळ

# देवराई अन् वनराई नाशिककरांचे 'ऑक्सिजन प्लॅन्ट'

**झाडे लावा, झाडे जगवा**

## ५ जूनला आठव्या वनमहोत्सवानिमित्त बांबू वननिर्मितीचा संकल्प

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २५ : कोरोना लाटांमध्ये ऑक्सिजनची महती सर्वदूर पसरली, प्राणवायूचे महत्त्व खोलवर रुजले. नाशिकच्या विकासामध्ये वाढत चाललेल्या काँक्रिटीकरणाच्या पार्श्वभूमीवर लोकसहभाग अन् वनविभागाप्रमाणेच इतरांच्या सहकार्यातून फाशीच्या डोंगरावर उभारलेल्या देवराईसह म्हसरूळची वनराई ही शहरवासीयांचे 'ऑक्सिजन प्लॅन्ट'' म्हणून ओळखले जाऊ लागले. पर्यावरणप्रेमी शेखर गायकवाड यांचा त्यासाठीचा रौप्यमहोत्सवी प्रवास अधोरेखित करणारा आहे. यंदा पावसाळ्यात साजरा होणाऱ्या आठव्या वन महोत्सवानिमित्त देवराईमध्ये ५ जूनला ३० प्रकारच्या दीड हजार बांबूची लागवड करत बांबू वन निर्मितीचा संकल्प करण्यात आला आहे.

श्री. गायकवाड यांनी गेल्या २५ वर्षांपासून आपला व्यवसाय सांभाळत पर्यावरणासाठी झोकून दिले आहे. महापालिकेने लावलेली आणि दुर्लक्षित झाडांना सगळ्यात पहिल्यांदा त्यांनी पाणी द्यायला सुरवात केली. शेतजमिनीवर उभ्या राहिलेल्या इमारतींच्या परिसरात स्थानिकांच्या सहकार्यातून वृक्षारोपण केले. त्यासाठी महापालिकेची मदत मिळायची. अनेकदा स्वखर्चातून त्यांनी रोपे विकत आणली. पर्यावरण प्रेमापोटी श्री. गायकवाड यांचा दिवस पहाटे सहापासून सुरू झाला आहे. जागा पाह्यची. पाण्याची उपलब्धता लक्षात घ्यायची. मग खड्डे खोदायचे. विकत आणलेली झाडे लावायची. महापालिकेकडून 'ट्री-गार्ड'' मिळवायचे. झाडांचे संगोपन करायचे. या त्यांच्या दिनक्रमात मित्रमंडळी जोडली गेली. हे सारे प्रयत्न एकीकडे सुरू असताना वृक्ष परिचय केंद्र गांधीनगरच्या पाठीमागे उभे केले. घराशेजारी त्यांनी १६० प्रकारची जंगली झाडे लावली. हे केंद्र पाहण्यात राज ठाकरे रमले होते. याशिवाय डॉ. प्रकाश आमटे, अभिनेते सयाजी शिंदे यांच्यासह राज्यभरातील अभ्यासकांनी पाहणी केली. विद्यार्थ्यांच्या सहली झाल्या.



नाशिक : शहरवासीयांचे ऑक्सिजन प्लॅन्ट म्हणून नावारूपाला आलेल्या देवराई आणि वनराई प्रकल्पांमध्ये फुललेली निसर्गराजी.

### मृत जंगल झाले जिवंत

म्हसरुळ भागातील मृत जंगल वनविभागाच्या सहभागातून जिवंत केले आहे. येथे वनराई उभी राहिली. ६ हजार झाडांची लागवड करण्यात आली. ३५ एकरांपैकी २ एकरावर झुडपाची लागवड करण्यात आली. २२ एप्रिलला १५० प्रकारच्या कमळाची बाग उभी राहिली आहे. याशिवाय जिल्हा नियोजनाच्या माध्यमातून सिमेंटचा बंधारा बांधला गेल्याने ७५ लाख लिटर पाणी उपलब्ध झाले आहे. आता याच ठिकाणी वन्यजीवांचा वावर वाढला आहे. हे काम उभे राहत असताना श्री. गायकवाड यांन चिमण्यांची १७ हजार घरट्यांचे वाटप केले आहे. जखमी पक्ष्यांसाठी काम केले आहे.

### 'आपलं पर्यावरण'च्या ठळक नोंदी

- नाशिक देवराईची स्थापना आणि ५ जून २०१५ ला ११ हजार रोपांची लागवड
- नाशिक वनराईची स्थापना आणि ५ जून २०१६ ला ६ हजार रोपांची लागवड
- देवराईमध्ये ५ जून २०१७ ला ११ हजार दुसरा वाढदिवस साजरा
- देवराईमध्ये ५ जून २०१८ ला बाबा सानप वेलींचे जंगल साकारले
- वनराईमध्ये ५ जून २०१९ ला ६ हजार झाडांचा वाढदिवस आणि ५०० झुडपाची लागवड
- देवराईमध्ये ५ जून २०२० ला लोकसहभागातून ८०० विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड
- देवराईमध्ये ५ जून २०२१ ला लोकसहभागातून ५ घनवनाची २ हजार ३०० रोपांची लागवड
- देवराई आणि वनराईमध्ये २२० देशी वृक्ष प्रजातींच्या ३२ हजार झाडांची ९० एकरामध्ये लागवड
- ४८ प्रकारच्या १ हजार वेलींची लागवड
- ४५ प्रकारच्या ५०० झुडपाची लागवड
- २७ प्रकारच्या २५० कंदमुळांची लागवड
- देवराई आणि वनराईचा महिन्याचा ८० हजार रुपयांचा खर्च लोकसहभागातून

### तरुणाईच्या ऊर्जेचा सकारात्मक उपयोग


गोदावरी नदीकाठचे सौंदर्य निसर्गराजीच्या सहवासात अबाधित राहावे म्हणून तपोवन ते शाहीमार्ग या भागात ८०० झाडे लावली आणि त्यांचा सांभाळ करण्यात आला. त्यातून ४० तरुणांचा चमू जोडला गेला. अशा तरुणाईच्या ऊर्जेचा सकारात्मक उपयोग करून घेत लोकांना जोडण्याचा विचार श्री. गायकवाड यांच्या मनात डोकावला. त्यासाठी जागा शोधण्यात दोन वर्षे गेली. मग त्यांना गिरीपुष्पांची वनविभागाने लागवड केलेला फाशीचा डोंगर खुणावू लागला. तिथे हिरवळ होती. पण जैव विविधता, पक्ष्याचा किलबिलाट ऐकू येत नव्हता. या ठिकाणी वृक्ष लागवडीला ७ एप्रिल २०१५ ला वनविभागाची परवानगी मिळाली. गिरीपुष्पांच्या झाडांच्या मधल्या भागात ११ हजार झाडे लावली. त्यासाठी त्यांनी पदरमोड केली. महिन्याला १५ हजारांचा खर्च केला. प्रकल्पासाठी १५ लाखांचा खर्च येणार होता. क्रेडाईने संरक्षक भिंत आणि खड्ड्यांसाठी मदत केली. दीड किलोमीटर पाइपलाइनचे काम केले. वृक्ष संवर्धनाचे प्रबोधन होण्यासाठी याच ११ हजार झाडांचा दुसरा वाढदिवस साजरा केला गेला. २०१८ मध्ये देणगीतून बाबा सानप वेलींचे जंगल साकारण्यात आले. १२ एकरावर १ हजार वेलींची लागवड करण्यात आली. गेल्यावर्षी कंदमुळांची लागवड केली. घनवन केले. या साऱ्या प्रयत्नांतून जैव विविधता साध्य करत असताना पक्ष्यांचा किलबिलाट वाढला. २८ प्रकारच्या पक्ष्यांची नोंद याठिकाणी झाली आहे. ५५ एकरात २३ हजार झाडे उभी राहिली आहेत.

Nashik, Nashik-Today
26/05/2022 Page No. 3

Dindori Road, Nashik

# Awareness Activities





# Awareness Activities

## Aapla Paryavaran spreading awareness about native tree species

*Tree identification information shared through WhatsApp*

**NASHIK:** The outbreak of Covid-19 has put the state to lockdown from March 21 the country from March 23. The lockdown put people behind walls. People are utilizing this time for various things, while some are just taking rest. The creativity of people is coming out in lockdown. Various online competitions are being conducted by various institutions.

The city-based entertainment NGO, Aapla Paryavaran has taken benefit of the lockdown. The NGO is creating awareness about Indian native species of trees. The information is shared on daily basis on social media platforms about one species every day. Images of trees bark, leaves and flowers is shared, with native name in Marathi and English and scientific name.

"Only motive behind this is to inform and educate people about native Indian species of tree. The information which is shared makes people curious about the trees. Sometimes we see these trees but we are unable to identify them. Without searching information people get more aware about environment."

The founder of Aapla Paryavaran, Shekhar Gaikwad informed Deshdoot Times that the initiative has been started from March 28. They share information on native species on social media platforms like WhatsApp. The initiative is getting very good response from people throughout the state. The information gets viral on various WhatsApp groups.

## निसर्गाच्या शाळेत फुटणार माहितीचे अंकुर

म. टा. प्रतिनिधी, नाशिक



वृक्षारोपण करत त्याचे संवर्धन करण्यात नाशिककर अग्रेसर ठरत असताना आता वृक्षांच्या शास्त्रोक्त अभ्यासासाठीही पुढाकार घेण्यात आला असून, वृक्ष परिचय केंद्रात रविवारी त्याचा श्रीगणेशा झाला. या 'निसर्ग शाळेत' यापुढे अनेक वर्ग भरणार असून, वन विभाग आणि आपलं पर्यावरण संस्थेच्या सहकार्याने त्याला आता अंकुर फुटले आहेत. प्रजाती, खोड, फुले, पाने, फळे यांची विस्तृत माहिती जाणून घेण्यासह नाशिककरांना वृक्षसाक्षर करण्याचा वसा या माध्यमातून हाती घेण्यात आला आहे.

भारतीय प्रजातींच्या वृक्षांची ओळख करून घेत त्यांच्या जैवविविधतेसह पर्यावरण रक्षणार्थ असलेली गरज हेरत वृक्ष अभ्यासाचे वर्ग नाशिककरांनी गिरविण्यास सुरुवात केली आहे. त्या अंतर्गत टाकळीरोड परिसरातील फुलसुंदर इस्टेटमधील वृक्ष परिचय केंद्रात १६५ पैकी ४५ प्रजातींचा अभ्यास करत 'निसर्गशाळा' उपक्रमाची नांदी करण्यात आली. यात वृक्षप्रेमी नाशिककरांसह वनस्पतिशास्त्राची पदवी घेणारे विद्यार्थी, पर्यावरणप्रेमींसह हौशी नाशिककरांनी सहभाग नोंदविला. आपलं पर्यावरण संस्थेचे शेखर गायकवाड यांनी विविध वृक्षांची खोडं केवळ सालीवरून कशी ओळखावीत, याबाबत माहिती दिली. एखादे वृक्ष त्याच्या खोडावरून, पानावरून व फुलांवरून ओळखले जाते. भारतीय प्रजातींची ओळख वाढली तरच पर्यावरणीय समतोल अबाधित राखणे सोयीस्कर होईल, अशी अपेक्षा गायकवाड यांनी व्यक्त केली. या अनोख्या उपक्रमामुळे नाशिकच्या समृद्धतेला जवळून अभ्यासणे शक्य होत असून, केवळ वृक्षारोपणाचा इव्हेंट यशस्वी करण्याऐवजी शास्त्रोक्त पद्धतीने संवर्धनासाठी कंबर कसणे महत्त्वाचे असल्याचे मत सहभागी नाशिककरांनी व्यक्त केले.

### वृक्ष परिचय केंद्रात वृक्षसाक्षरतेचे उपक्रम

**" आपलं पर्यावरण आणि वन विभागाच्या साह्याने नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे विविध वृक्ष प्रजातींची माहिती पोहोचणार आहे. वृक्षसाक्षरतेसाठीच ही मोहीम आहे. यातून संवर्धनाची चळवळ मजबूत होऊ शकेल.**

- पंकज गर्ग, उपवनसंरक्षक, नाशिक पश्चिम

# Community Activities



# Community Activities

## Just your one hour for your city



**NASHIK:** Considering environmental protection and conservation as a social responsibility and a national civic duty, the initiative 'Just your one hour for your city' has been undertaken through the concept of Aapla Paryavaran organization. Through that everyone has to conduct community work cleanliness drive in their locality on the second Sunday of every month. In accordance with this concept, 300 trees on the 800-metre jogging track of Indiranagar were watered by local citizens on Sunday (May 14). Citizens from Gandhinagar, Ambad Shivar, Satpur village and Gangapur road area also responded to this initiative.

**Keep city clean initiative**

Shekhar Gaikwad, the founder of Aapla Paryavaran organisation had appealed to people to clean up their area within an hour by donating labour and Nashikites responded to the appeal with spontaneity.

At present the trees are drying up due to increased summer heat. So this activity was implemented as a social responsibility. Among them Ravindra Dusane of Manavata Help Foundation, Avadhoot Kulkarni of Indira Nagar jogging track committee, Nana Athawale of Nashik Cyclist Foundation, Sadhana Dusane, Manoj Karpe and Chandrakant Naik of of Nature and Me Group, Nishant Thakur and Rajesh Joshi of Sriji Sankalp and residents of Indira Nagar area participated in the activity.

Many citizens participated in this activity from their respective divisions. Citizens in a locality near Gandhinagar conducted a cleanliness drive in their building. Residents of Om Colony, Mahajan Nagar and Ambad Shivar also conducted cleanliness their area. Shekhar Gaikwad expressed his desire to create a cleanliness movement in the city, as the citizens are encouraged to clean their surroundings through this medium and the message of not littering is also given.

> *Don't think of some perverted mentality around you. If there is any problem definitely call.*
>
> ***Shekhar Gaikwad***
> *Aapla Paryavaran organisation*

## प्रदूषणमुक्तीसाठी 'कम्युनिटी वर्क'चा संकल्प!

### महिन्यातून दोन तास श्रमदानाचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

नाशिककरांमध्ये स्वच्छतेबाबतची जाणीव निर्माण करण्यासाठी 'कम्युनिटी वर्क फॉर अवर नाशिक' हा उपक्रम सुरू केला जात आहे. यासाठी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या रविवारी सकाळी सात ते आठ यावेळेत आपण राहतो त्या परिसरात श्रमदान करत स्वच्छ, सुंदर आणि हरित नाशिकचे स्वप्न पूर्ण होऊ शकते. यासाठी फक्त महिन्यातून दोन तास देण्याचे आवाहन पर्यावरण प्रेमी शेखर गायकवाड यांनी केले असून, या उपक्रमाला उद्या, रविवारपासून (दि. ९) सुरुवात होत आहे.

काही दिवसांपूर्वी महापालिका आयुक्तांनी 'स्वच्छ भारत मिशन'च्या अंतर्गत स्वच्छतेची शपथ घेण्याबाबत नाशिककरांना आवाहन केले होते. मात्र, स्वच्छ नाशिकसाठी केवळ ऑनलाइन शपथ घेणे पुरेसे नाही. रस्त्यांवर उतरून खऱ्या अर्थाने काम करणे आवश्यक आहे. यासाठीच 'कम्युनिटी वर्क फॉर अवर नाशिक' हा उपक्रमाची कल्पना पुढे आली. शहरातील विविध परिसरांतील कचरा उचलून स्वच्छ, सुंदर आणि हरित नाशिकचा संदेश प्रत्येक नाशिककर देऊ शकतो. मात्र, यासाठी कुठे जमायचे नसून, नाशिककरांनी आपण जेथे राहतो त्या गल्ल्या जरी स्वच्छ करण्यासाठी महिन्यातून दोन रविवार आणि फक्त एक तास दिला तरी स्वच्छतेबाबत नाशिककरांमध्ये जाणीव जागृती होऊ शकते, असे आवाहन शेखर गायकवाड यांनी 'मटा'शी बोलताना केले.

'शहराने आपल्याला बरेच काही दिले आहे, आता वेळ आहे ती शहराला परतफेड करण्याची. कमी जास्त प्रमाणात आपण प्रत्येकाने निसर्गाचे नुकसान केलेच आहे. त्यामुळे आता नाशिकच्या उज्ज्वल भविष्यासह स्वच्छ, सुंदर आणि हरित नाशिकचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नाशिककरांनी उपक्रमात सहभागी व्हावे,' असेही आवाहन त्यांनी केले आहे. एकजुटीने समाजकार्य केल्यास त्याचा फायदा शहराला होऊ शकतो, असेही ते सांगतात.



**सहभागासाठी येथे साधा संपर्क**

महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या रविवारी आपण आपल्या गल्ली, सोसायटीची सकाळी ७ ते ८ या वेळेत एकत्र येत स्वच्छता करायची आहे. आपण शहराच्या बाहेर असाल तर जेथे आहात तेथील अस्वच्छता दूर करण्यासाठी योगदान देत या उपक्रमात सहभागी होता येईल. गोळा झालेला कचरा घंटागाड्यांना देता येईल. आपण या उपक्रमात सहभागी होऊ इच्छित असाल तर या ९४२२२६७८०१, ९१३०२५७८०१ क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच आपण स्वच्छता करतानाचा फोटो व्हॉट्सॲप करावा.



**"स्वच्छ, सुंदर आणि हरित नाशिकची ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. त्यामुळे नाशिकला प्रदूषणमुक्त करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी उपक्रमात सहभागी व्हावे. प्रत्येकाने महिन्यातील केवळ दोन तास उपक्रमासाठी दिल्यास नाशिकचा कायापलट होऊ शकतो.**

– शेखर गायकवाड, पर्यावरणप्रेमी

# Community Activities

लोकमत

महिन्यातून दोन दिवस, दोन तास : उद्याने, मोकळे भूखंड, सोसायट्यांच्या परिसरात स्वच्छता

## ‘कम्युनिटी वर्क फॉर नाशिक’करिता सरसावले शेकडो हात!

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : ‘स्वच्छ नाशिक, सुंदर नाशिक’करिता आता नाशिककर स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेऊ लागले आहेत. ‘कम्युनिटी वर्क फॉर नाशिक’हा अभिनव उपक्रम आपलं पर्यावरण संस्थेने हाती घेतला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून नाशिककरांना साद घालून प्रत्येक महिन्यात दुसऱ्या व चौथ्या रविवारी प्रत्येकी एक तास आपल्या परिसरासाठी श्रमदान करण्याचे आवाहन करण्यात आले. पहिला टप्पा नुकताच पार पडला. त्यास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपापल्या भागात स्वच्छता मोहीम राबविली. येत्या रविवारी (दि. २३) या मोहिमेचा दुसरा टप्पा आहे.

आपण ज्या समाजात राहतो, त्या समाजाचं काही देणं लागतो आणि सामाजिक बांधिलकी म्हणून आपलेही सुजाण नागरिक म्हणून आपले काही कर्तव्य आहे, हे लक्षात घेऊन शहरासाठी ‘कम्युनिटी वर्क’ ही संकल्पना पर्यावरणप्रेमी शेखर गायकवाड यांनी सोशल मीडियावरून मांडली. त्यांनी व्हॉट्सॲपच्या विविध ग्रुपचा वापर करत नागरिकांपर्यंत ही संकल्पना पोहचविण्यास सुरुवात केली. नागरिकांनाही संकल्पना पटली आणि रविवारी (दि. ९) आपापल्या परिसरात स्वच्छता केली. मोकळे भूखंड, उद्याने, समाज मंदिरे, मंदिर, व्यायामशाळा, अभ्यासिका यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी तसेच रस्त्यांच्या कडेला पडलेला कचरा गोळा केला. अंबड शिवारातील ओम कॉलनी, महाराजनगर परिसरातील आनंदघन उद्यानात तरुणांनी स्वच्छता करत तासाभरात ६ गोण्या भरून कचरा गोळा करत घंटागाडीत टाकला.





### स्वयंस्फूर्तीने स्वच्छता...

- इंदिरानगर, गंगापूररोड, सावरकर-नगर, उपनगर, जेलरोड, पंचवटीतील दिंडोरी रोड, तपोवन, सिडको आदी भागात रहिवाशांनी आपल्या सोसायट्यांचा परिसर व आजुबाजुच्या सार्वजनिक ठिकाणीही स्वच्छता केली.
- स्वच्छता करतानाचे व्हिडीओ, फोटो व्हॉट्सॲपला स्टेटस व फेसबुक, इन्स्टाग्रामवर ‘स्टोरी’ ठेवत ‘आपले नाशिक आपण स्वच्छ ठेवूया’ असे घोषवाक्यही लिहून जनजागृतीही केली.

### अशी आहे संकल्पना...

- आपल्या शहरासाठी आपण सार्वजनिक काम करत हातभार लावावा, अशी ही साधी सोपी संकल्पना आहे.
- यामध्ये परिसर स्वच्छता, योग्य ठिकाणी वृक्षारोपण, वाढलेल्या झाडांच्या खोडांना गेरू, चुना रंगविणे, झाडांचे बुंधे डांबरीकरण, काँक्रिटीकरणातून मुक्त करणे, उद्याने स्वच्छ करणे, रस्त्यांलगत मातीचे भांडी ठेवून त्यात पाणी टाकावे आदी सामाजिक कामे या उपक्रमांतर्गत केली जाऊ शकतात.

### ‘कम्युनिटी वर्क’ कशासाठी?

सामाजिक दायित्वाची भावना प्रत्येकाच्या मनात रुजावी आणि त्याचे प्रतिबिंब समाजात उमटावे, हा या संकल्पनेचा उद्देश आहे.

यामुळे सामाजिक जीवनात वावरताना स्वयंशिस्त व समाजासाठी, शहरासाठी आपण काही तरी केल्याचे आत्मिक समाधान प्राप्त होण्यास मदत होईल.

यासाठी ही संकल्पना राबविली जात असल्याचे शेखर गायकवाड यांनी सांगितले.

Hello Nashik
Page No. 3 Apr 18, 2023
Powered by: erelego.com


Impact



# 1,50,000+

Trees planted with over 95% survival rate




# 200+ acres


Land vegetated making it habitable for many birds and animals



# Recognition

# Awards and Recognition






# Awards and Recognition






# देवराईकार शेखर गायकवाड यांना एनसीएफचा पुरस्कार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक** – तब्बल दोन तपांपासून वृक्षांशी मैत्र जपत वृक्ष संवर्धनाला लोकचळवळीचे रुप देऊन डोंगर परिसराचे जैवविविधतेने बहरलेल्या देवराईत रुपांतर करणाऱ्या, ओसाड वनजमिनीवर अनोखी अशी कमळबाग आणि वनराई फुलविणाऱ्या शेखर गायकवाड यांना नाशिक सिटीझन्स फोरमने एप्रिल महिन्यासाठीचा आउटस्टँडिंग सिटीझन अवार्ड जाहीर केला आहे.

शहराच्या उन्नती आणि उत्थानासाठी विविध क्षेत्रांत अविरतपणे कार्यरत असणाऱ्या ज्ञात, अज्ञात व्यक्तींच्या कामाला दाद देण्यासाठी नाशिक सिटीझन फोरमतर्फे दर महिन्याला आउटस्टँडिंग सिटीझन ऑफ नाशिक हा पुरस्कार घोषित केला जातो. शालेय जीवनापासूनच पक्षी आणि वृक्षांकडे ओढा असलेल्या शेखर यांचा प्रवास व्यक्तिगत धडपडीपासून ते वृक्ष संवर्धनाच्या लोकचळवळीचा प्रणेता असा झालेला आहे. प्रारंभी सकाळी भ्रमंतीला जाताना दिसतील त्या रोपांना जगविण्याची शेखर यांची नेहमीची धडपड पाहून दोन तरूण त्यांना येऊन मिळाले. लोकसहभागाचा हा प्रवाह पुढे वाढत जाऊन त्याला जणू चळवळीचेच रुप लाभले. त्यातूनच सातपूर येथील फाशीच्या डोंगरावर सुमारे ५५ एकरांवर साकारलेली देवराई ही वनसंवर्धनाचा व जैवविविधता पुर्ननिर्माणाचा आदर्श ठरते आहे. देवराईचे यश पाहून वन खात्याने शेखर यांना म्हसरूळ परिसरातील ३५ एकर जमीन वनराई प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिली. याच ठिकाणी शेखर यांनी कमळाच्या सुमारे १५० प्रजाती असलेली अनोखी अशी कमळबाग साकारली असून गत महिन्यात तीचे उद्घाटन झाले आहे. फॅब्रिकेशनचा व्यवसाय करणाऱ्या आणि शिक्षणाने अभियंता असलेल्या शेखर यांनी वनस्पतीशास्त्राचे कुठलेही औपचारीक शिक्षण घेतलेले नसले तरी त्यांचा या क्षेत्रातील अभ्यास आणि निरिक्षण सखोल आहे. देवराईत २१६ प्रजातींची ३० हजारांपेक्षा जास्त झाडे, ४८ प्रकारच्या वेली, ४५ प्रकारची झुडूपे, २७ प्रकारची कंदमुळे रुजली आहेत. त्याचप्रमाणे विविध प्राणी, पक्षी, किटक यांचा अधिवासही विकसीत झाला आहे. म्हसरूळच्या वनराई प्रकल्पातही ३५ एकर जागेत विविध प्रजातींचे नऊ हजारांपेक्षा जास्त वृक्ष वाढत आहेत.

नाशिक परिसरासह भरवीर, सटाणा, जव्हार, मोखाडा, चांदवड, सिन्नर, दिंडोरी अशा विविध ठिकाणी वृक्षलागवडीसह ते पक्षी संवर्धनाचे काम करत आहेत. त्यांनी आजवर महाराष्ट्रभर १५ हजार घरट्यांचे वाटप केले आहे. हजारो जखमी पक्षांची सुश्रृषा करून त्यांना जीवदान देण्याचे काम गायकवाड यांनी केले. लोकवर्गणी बरोबरच स्वखर्चातून कार्य करणाऱ्या गायकवाड यांनी वृक्ष लागवडद्वारे गोदाकाठ हरित करण्याचा संकल्प सोडला आहे.

लोकसत्ता Sun, 08 May 2022
https://epaper.loksatta.com/c/67910631

# Media


KHOJ
THE JUNGLE MAN
VLOG
WATCH NOW
0:00 / 17:37


मेलेलं वन
जिवंत करणारा
'जंगल मॅन'
BBC NEWS | मराठी
0:00 / 3:39


Contribute



# Volunteer

Come with us and take part in the current activities



# Donations

Help us to cover our expenses

Our expenses consist of salary of security personnel, machinery expenses, equipment costs, electricity bill, sapling cost, fertilizer cost, maintenance accruals etc.

All donations are eligible under 80G, CSR, and 12A.

# Contact

## Phone

+91 94222 67801

## Website

www.aaplaparyavaran.org

Our purpose is fueled by the efforts of numerous people and organisations.

Thank you.